Devrukh Shikshan Prasarak Mandal's

## Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S.R. Sapre Commerce and Vid. Dadasaheb Pitre Science College (Autonomous)

Devrukh, Dist: Ratnagiri- 415 804, Maharashtra

गुरुवार दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुखच्या मराठी विषयाच्या अभ्यासमंडळातील सदस्यांची पहिली सभा सकाळी ११ वाजता हॉल क्रमांक ३ मध्ये आयोजित करण्यात आली.

सदर सभेत पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

- प्रथम वर्ष कला मराठीच्या जुन्या अभ्यासक्रमाचा आढावा
- नवीन अभ्यासक्रमाबाबत चर्चा
- विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापनाबाबत चर्चा
- सत्राच्या अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत चर्चा
- बहिस्थ परीक्षक व पेपरसेटर्स यांचे मंडळ निश्चित करणे
- पुढील वर्षाचे वार्षिक नियोजन
- अभ्यासक्रमाचे फलित
- कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विचारविनिमय

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

डॉ. वर्षा शिरीष फाटक

प्रा.अजित जाधव

डॉ. तुकाराम रोंगटे

डॉ. राजश्री देशपांडे

डॉ. अनिल सपकाळ

प्रा. नीतिन आरेकर

डॉ. निधी पटवर्धन

डॉ. रणधीर शिंदे

वरील विषयांस अनुसरून झालेल्या चर्चेनुसार खालील ठराव मांडण्यात आले.

ठराव क्रमांक १

डॉ. वर्षा फाटक यांनी अभ्यासमंडळातील उपस्थित सदस्यांचे स्वागत करून कामकाजास सुरुवात केली. प्रथम मागील वर्षाच्या अभ्यासक्रमाची माहिती सदस्यांना दिली. व

नवीन अभ्यासक्रम तयार करताना ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांचे आकलन व परिसराच्या गरजा लक्षात घेऊन त्यांस उपयुक्त ठरेल असा अभ्यासक्रम करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

अनुमोदक डॉ. राजश्री देशपांडे

ठराव क्रमांक २

प्रथम वर्ष कलाचा नूतन अभ्यासक्रम ठरविताना त्यांना वेगवेगळ्या साहित्यप्रकारांची, नवीन वाङ्मयीन प्रवाहांची ओळख होईल. अभ्यासक्रमास नेमलेल्या साहित्यकृती विद्यार्थ्यांची अभिरुची संपन्न करतील. त्याचबरोबर मराठी विषयाच्या अनुषंगाने असणाऱ्या व्यवसायाच्या संधी लक्षात घेऊन तसाच अभ्यासक्रम ठरवावा असे मत डॉ. निधी पटवर्धन यांनी मांडले. त्यास डॉ. रणधीर शिंदे यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक ३

विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ठरविताना सत्राअखेरीस ७० गुणांची लेखी परीक्षा व ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी प्रत्येक विषयपत्रिका १०० गुणांची असेल त्यामध्ये अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाह्य वाङ्मयीन उपक्रम घ्यावेत जेणेकरून विद्यार्थी स्वयंअध्ययनास प्रवृत्त होतील. मराठी वाङ्मय मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग असेल असेच अंतर्गत मूल्यमापनाचे स्वरूप ठेवावे. तसेच सत्राच्या अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेचे स्वरूप विद्यार्थ्यांस आकलनसुलभ असेल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यास डॉ. तुकाराम रोंगटे यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक ४

विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेचे पेपर तयार करणे, तपासणे व मॉडरेट करणे यासाठी मराठी विभागप्रमुखांनी विद्यापीठातील मान्यताप्राप्त महाविद्यालांतील योग्य प्राध्यापकांची निवड करावी. असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यास डॉ. राजश्री देशपांडे यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक ५

प्रथम वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी नेमलेला यावर्षीचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन पुढील वर्षाचा अभ्यासक्रम त्यांच्या जाणिवा अधिक समृद्ध करणारा असेल हा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून तशा प्रकारच्या अभ्यासक्रमावर चर्चा करण्यात आली. यामध्ये डॉ. रोंगटे यांनी केलेल्या सूचनांस डॉ. रणधीर शिंदे यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक ६

मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात असणाऱ्या व्यवसाय व रोजगाराभिमुख संधी लक्षात घेऊन तशाच प्रकारचे उपयुक्त असे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्याचे ठरविण्यात आले.

यामध्ये १) मुद्रितशोधन, २) संहितालेखन, काव्यलेखन(सर्जनशील लेखन), ३)काव्य, नाट्य कथा सादरीकरण, ४) संगणकीय ब्लॉगलेखन, ५) पत्रकारिता यापैकी कोणतेही दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रम घ्यावेत.

तसेच विद्यार्थ्यांस कोणताही एक कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम द्यावा. असे सर्वानुमते ठरविण्यात आले त्यास डॉ. निधी पटवर्धन यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक ७.

एकूणच अभ्यासक्रमाचे फलित पुढील गोष्टींना अनुसरून असावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यास डॉ. राजश्री देशपांडे यांनी अनुमोदन दिले.

- विद्यार्थ्यांना वाचन, श्रवण व लेखन या तिन्ही कौशल्यांचे आकलन.
- साहित्याची अभिरुची व समज निर्माण.
- साहित्याचे समाजाशी असणारे अनुबंध व बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची ओळख.
- जागतिकीकरण, महानगरीकरण यांचा नागरीजीवनावर होणारा परिणाम यांचे आकलन.
- भविष्यातील रोजगार व व्यवसायाच्या संधी मिळविता याव्यात अशीच कौशल्य विकसित करणारा अभ्यासक्रम असल्याने पत्रकारिता, जाहिरात क्षेत्र, विविध माध्यमांवरील प्रसारणे, व्याख्याने व निवेदन, स्वतंत्र कार्यक्रम, मुद्रणालय, संहितालेखन या क्षेत्रात सक्षमपणे कार्य करण्याची संधी.
- नाट्यतंत्र व नाटक यांच्या आकलनामुळे रंगमंचीय सादरीकरण कलांची ओळख व व्यावसायिक संधी.
- संशोधनाची आवड निर्माण.
- इव्हेंट मॅनेजमेंट कौशल्य आकलन व उपयोजन.

प्रथम वर्ष कला मराठी विषयाचा अभ्यासक्रम सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सही

नाव:
चेअरमन
मराठी अभ्यासमंडळ
आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत महाविद्यालय,
देवरुख
दिनांक :